**प्रेसनोट दि. ०६.०६.२०२३**

लोकसेवक श्री. मारूती विलास सातपुते, वय-३३ वर्षे, तलाठी आष्टा व तलाठी कार्यालय आष्टा येथे काम करणारा खाजगी इसम तबरेज मुजावर यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १५,०००/- रूपये व त्यानंतर १०,०००/- रूपये लाचेची मागणी केली तसेच तलाठी सातपुते यांनी तक्रारदार यांचे प्रलंबित काम करून दिल्याचे मोबदल्यात १०,०००/- रूपये, तडजोडीअंती ८,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याने त्यांचे विरुद्ध सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे वडीलांनी खरेदी केलेल्या जमिनीचे ७/१२ उताऱ्यावर तक्रारदार यांचे वडीलांचे नावाची नोंद होणेकरीता तलाठी कार्यालय आष्टा येथे दिलेल्या अर्जाप्रमाणे कारवाई करण्याकरीता तलाठी सातपुते व खाजगी इसम तबरेज मुजावर यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि. ०७.०२.२०२३ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचे वडीलांनी खरेदी केलेल्या जमिनीची ७/१२ उताऱ्यावर नोंद घालणेकरीता तलाठी कार्यालय आष्टा येथे काम करणारे खाजगी इसम तबरेज मुजावर यांनी तलाठी सातपुते यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती १५,०००/- रूपये व त्यानंतर १०,०००/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच तलाठी मारूती सातपुते यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे नावाची ७/१२ उताऱ्यावर नोंद केल्याचा मोबादला म्हणून तक्रारदार यांचेकडे प्रथम १०,०००/- रूपये व तडजोडीअंती ८,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री. मारूती विलास सातपुते, वय-३३ वर्षे, तलाठी आष्टा व तलाठी कार्यालय आष्टा येथे काम करणारा खाजगी इसम तबरेज मुजावर यांचेविरुध्द आष्टा पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे, पोलीस अंमलदार अजित पाटील, प्रितम चौगुले, सुदर्शन पाटील, रविंद्र धुमाळ, चंद्रकांत जाधव, सिमा माने, उमेश जाधव चालक वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक * लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली *

(संदीप पाटील)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner